MHNS160004882016

**<u>नियमीत दिवाणी दावा क्र. ७६/२०१६ मध्ये निशाणी ४३ खाली आदेश</u>**

**कचरु मंडलीक वि. रामदास मंडलीक**

१. सदरचा अर्ज वादीने दिवाणी प्रक्रिया संहिता ऑर्डर २२ रुल ४ प्रमाणे वारस रेकॉर्डवर घेण्यासाठी तसेच ऑर्डर ६ रुल १७ प्रमाणे आवश्यक ती दुरुस्ती करुन मिळण्यासाठी दाखल केलेला आहे.

२. सदर अर्जामध्ये वादींनी कथन केले आहे की, त्यांनी प्रस्तुतचा दावा अतिक्रमित क्षेत्राचा ताबा व कब्जा मिळण्यासाठी, निरंतर ताकिदीसाठी व दरम्यानच्या कालावधीचे उत्पन्नाचे नुकसान भरपाई मिळण्यासाठी दाखल केलेला आहे. सदरचा दावा न्यायप्रविष्ठ असतांना प्रतिवादी क्र. ७ मोतिराम मंडलीक हे दि.१८.०६.२०२२ रोजी व प्रतिवादी क्र. १५ निंबा भिका मंडलीक हे दि.२२.१०.२०१६ रोजी मयत झालेले आहेत. मात्र त्याबाबतची माहिती वादीला वेळेत मिळाली नाही. प्रतिवादी क्र. १५ मयत झाल्याचा अहवाल अभिपटलावर दाखल झाला. मात्र अनावधानाने त्यांचे वारस अभिपटलावर घेणे अनावधानाने राहून गेल्याचे वादीने कथन केले आहे.

३. त्यामुळे मयत प्रतिवादी क्र. ७ व मयत प्रतिवादी क्र. १५ चे कायदेशीर वारस प्रस्तुत दाव्यामध्ये आवश्यक पक्षकार असल्यामुळे त्यांना रेकॉर्डवर घेण्यासाठी व त्या अनुषंगाने दुरुस्ती करण्यासाठी वादीने सदचा अर्ज दिलेला आहे.

४. सदर अर्जावर प्रतिवादींनी म्हणणे दिले असून त्यांनी कथन केले आहे की, वादीने प्रतिवादी क्र. १५ च्या मृत्यूनंतर तब्बल १० वर्षांनी व

प्रतिवादी क्र. ७ च्या मृत्यूनंतर जवळपास अडीच वर्षांनी सदरचा अर्ज दिलेला असून तो कायद्याने चालण्यास पात्र नाही. वादीमुळे विनाकारण सदरचे प्रकरण लांबणीवर पडत असल्यामुळे सदरचा अर्ज खर्चासह नामंजूर करण्याची विंनती प्रतिवादींनी केलेली आहे.

५. वादींचा अर्ज व त्यावरील प्रतिवादींचे म्हणणे वाचले. दोन्ही विधिज्ञांचा युक्तिवाद ऐकला. अभिपटलाच्या अवलोकनावरुन असे दिसून येते की, प्रतिवादी क्र. ७ मोतिराम मंडलीकच्या मृत्यूनंतर वादीने प्रस्तुतचा अर्ज जवळपास अडीच वर्षाच्या विलंबाणे दिलेला आहे. तसेच प्रतिवादी क्र. १५ निंबा मंडलीकच्या मृत्यूनंतर जवळपास १० वर्षाच्या इतक्या मोठ्या विलंबाने वादीने सदरचा अर्ज दिलेला आहे. वादीने विलंबासाठी त्याच्या अर्जात कोणतेही संयुक्तिक व पटण्यासारखे कारण दिलेले नाही व त्याबाबत कोणताही पुरावा देखील दिलेला नाही.

६. मात्र प्रस्तुतचा वाद दिवाणी असल्यामुळे मयत प्रतिवादींचे वारस अभिपटलावर घेणे कायद्यानुसार गरजेचे आहे व त्यामुळे इतर प्रतिवादींचे कोणतेही नुकसान होणार नाही. मयत प्रतिवादी क्र. ७ व प्रतिवादी क्र. १५ चे वारस रेकॉर्डवर घेतल्यास व त्या अनुषंगाने दाव्यामध्ये दुरुस्ती केल्यास त्यामुळे दाव्याच्या योग्य निर्णयासाठी मदतच होणार आहे व दाव्यामध्ये विनाकारण कोणतीही गुंतागुंत निर्माण होणार नाही. मात्र वादीमुळे प्रस्तुतकामी जो विनाकारण प्रचंड विलंब झालेला आहे. त्यासाठी वादीवर दंड आकारणे देखील कायद्याने गरजेचे आहे. सबब, वरील सर्व विवेचनाच्या अनुषंगाने मी पुढीलप्रमाणे आदेश पारित करत आहे.

## – <u>आदेश</u> –

१. वादींचा प्रस्तुतचा अर्ज वादीने रक्कम रुपये ५००/– सरकार जमा करण्याच्या अटीवर मंजूर करण्यात येतो.

२. सदरची दंडाची रक्कम भरल्यानंतरच वादीला अर्जात नमुद दुरुस्ती करता येईल याची वादीने नोंद घ्यावी.

३. सदरचे प्रकरण जुने असल्यामुळे दोन्ही पक्षकार व त्यांच्या विधिज्ञांना निर्देशित करण्यात येते की, त्यांनी सदरचे प्रकरण जलदगतीने चालवावे.

SUNGARE VRUSHALI DINANATH
Digitally signed by SUNGARE VRUSHALI DINANATH
Date: 2026.03.12 17:14:16 +0530

दिनांक :– १०.०३.२०२६
ठिकाण :– चांदवड

(वृषाली दी. सुंगारे)
सह दिवाणी न्यायाधीश, क.स्तर,
चांदवड.